सं.फौ.ख.क्र.२६६/२०२१

नि. १५

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथपूर्वक जबाब**

**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नाव – मारूती तुकाराम नांगरे,**

**वय –** ६८ वर्षे, व्यवसाय– सेवानिवृत्त,

**राहणार –** लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर.

---

**<u>सरतपास– अभियोगपक्षातर्फे श्री. जी.व्ही. बोर्डे,विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे</u>**

दिनांक ०३/१२/२०२० रोजी मी कोल्हारकडून लोणी येथे जात होतो. त्यावेळी मला तेथे अपघात झाल्याचे दिसले. त्यावेळी तेथे पोलीस कर्मचारी श्री. घोडे व इतर बरेच लोक हजर होते. त्यावेळी तेथे पंचनामा चालू होता. त्यावेळी तेथे मयताचा पंचनामा सुरू होता. सदर घटना बाळासाहेब आहेर चौकाच्या पुढे घडली होती. त्यावेळी तेथे पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व त्यानंतर त्यांनी माझी सही घेतली. त्यावेळी तेथे अण्णासाहेब मगर हजर होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १६** देण्यात आला. सदर रस्ता पूर्व पश्चिम असा होता. बाळासाहेब आहेर यांचे घर अपघात स्थळाच्या दक्षिण दिशेला आहे. घटनास्थळाच्या उत्तरेला मंगल कार्यालय आहे. दक्षिणेला आहेर वस्ती आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.पी.एस.सापते यांचेतर्फे</u>**

**२.** मी नमुद दिवशी कारखान्याकडून दुपारी ०२.१० वाजता लोणीकडे जाण्यासाठी निघालो होतो. घटनास्थळ हे कारखान्यापासून एक ते सव्वा किलोमीटर अंतरावर होते. मी घटनास्थळावर अडीच वाजण्यापूर्वी पोहचलो. माझ्या मोटारसायकलचा क्रमांक एम.एच.१७ बी.क्यू. ९४१४ असा होता. त्यावेळी मी एकटाच माझे मोटारसायकलवर जात होतो. मी घटनास्थळावर गेल्यानंतर मला पोलीस कर्मचारी श्री.घोडे यांनी पंचनामा सुरू असून तेथे मला थांबण्यास सांगितले. मला घटनेची माहिती श्री.घोडे यांनी दिली होती. घटना दिनांक ०३/१२/२०२० रोजी ०२.०० ते ०२.३० च्या दरम्यान घडल्याची माहिती मला श्री. घोडे यांनी दिली होती. मी घटनास्थळावर पोहचण्याच्या ५ ते १० मिनीटापूर्वी घटना घडली होती. मी

सं.फौ.ख.क्र.२६६/२०२१
नि. १५

ज्यावेळी घटनास्थळावर पोहचलो त्याचे आधीच मयताचे प्रेत तेथून उचलून नेले होते. पोलीसांनी माझेसमक्ष तेथे मोजमाप घेतले होते. त्यावेळी माझेसोबत तेथे पोलीस होते. हे म्हणणे खरे आहे की, मला घटना कशी घडली व कोणाच्या चुकीमुळे घडली याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणताही घटनास्थळ पंचनामा नमुद दिवशी झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पोलीसांच्या सांगण्यावरून मी पोलीस स्टेशनला सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**साक्षीदार मुक्त.**

माझे समक्ष

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2025.09.17 11:09:47 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३, राहाता.
दिनांक – १६/०९/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2025.09.17 11:09:55 +0530

(प्र. शं. गिरगांवकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ३, राहाता.
दिनांक – १६/०९/२०२५